संस्कारक्षम पिढी घडण्यासाठी वाचन आवश्यक- श्री. युवराज मोहिते

"आजची तरुण पिढी संस्कारक्षम घडण्यास युवकांनी वाचनाची सवय लावून घेणे गरजेचे आहे. आजच्या तरुणांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण होत नाही हे जाणून आजचा दिवस डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ' वाचन प्रेरणा दिन ' म्हणून साजरा केला जात आहे. ज्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची सवय निर्माण व्हावी यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन आणि पुस्तकाचे वाचन विद्यार्थ्यांच्याकडून करून घेतले जाते. वाचनाने माणसाचे विचार प्रगल्भ होतात." असे वक्तव्य गोविंदराव हायस्कूल येथील मराठी विषयाचे प्राध्यापक श्री. युवराज मोहिते यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये बोलत होते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त शासनाच्या मार्गदर्शनानुसार संविधानाची उद्देशिका तसेच संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्य याचे वाचन विद्यार्थ्यांनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ . बी.एन. कांबळे हे होते. तरुणांनी वाचनाने आपले विचार समृद्ध करून मन, मेंदू आणि मनगट कार्यक्षम व्हावे असे विचार त्यांनी मांडले. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी देखील विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी प्रोत्साहन दिले. महाविद्यालयाचे ग्रंथालय व एन.एस.एस. विभाग यांचे कडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एन.एस.एस. प्रोग्राम ऑफिसर श्री. अमीन बाणदार व सदस्य डॉ. डी. एस. कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राध्यापिका डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी करून दिली. तर आभार प्रदर्शन श्री. एम. पी. केसरकर यांनी केले.